**वाचा:-** 1. शासन निर्णय क्रमांक:टंचाई-1099/प्र.क्र.12/पापु-14 मंत्रालय मुंबई दिनांक-3 फेब्रुवारी 1999
2. शासन निर्णय ग्रा.पा.पु.स्व.वि. क्रमांक:टंचाई-2016/प्र.क्र.143/पापु-14 दिनांक-4 मे 2016
3. शासन निर्णय ग्रा.पा.पु.स्व.वि. क्रमांक:टंचाई-2018/प्र.क्र.20/पापु-14 दिनांक-14 फेब्रुवारी 2018
4. मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. हिंगोली यांचे पत्र दि. 04.02.2019,05.03.2019,07.03.2019 व 30.03.2019.

2533

जा.क्र.2019/पा.टं./प्रशा.मा./कावी- दिनांक :- 08.05.2019

**विषय:-** पाणी टंचाई कृती आराखडा -2018-19
तात्पुरती पुरक नळ योजनेस प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत.

**::आदेश ::**

मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.हिंगोली यांनी पाणी टंचाई 2018-19 अंतर्गत तात्पुरती पुरक नळ योजनेचे खालील प्रमाणे अंदाजपत्रके सक्षम अधिकारी यांची तांत्रीक मंजुरी घेऊन प्रशासकीय मान्यतेसाठी या कार्यालयास सादर केले आहेत. त्यानुसार हिंगोली जिल्हयातील पाणी टंचाई परिस्थिती विचारात घेऊन खालील विवरणपत्रात नमुद केल्या प्रमाणे योजनेच्या अंदाजपत्रकाना खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | योजनेचे नाव व गाव | तालुका | अंदाजीत रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| **तात्पुरती पुरक नळ योजना** | | | | |
| 1 | मौ. बोरीसावंत | वसमत | 97731/- | अंदाजपत्रकात नमुद केल्याप्रमाणे तात्पुरती पुरक नळ योजना करणे. |
| 2 | मौ. खेड | हिंगोली | 349300/- | अंदाजपत्रकात नमुद केल्याप्रमाणे तात्पुरती पुरक नळ योजना करणे. |
| 3 | मौ. आडगाव (मु.) | हिंगोली | 246750/- | अंदाजपत्रकात नमुद केल्याप्रमाणे तात्पुरती पुरक नळ योजना करणे. |
| 4 | मौ. वैजापुर | हिंगोली | 379300/- | अंदाजपत्रकात नमुद केल्याप्रमाणे तात्पुरती पुरक नळ योजना करणे. |
| 5 | मौ. कोंढुर | कळमनुरी | 433328/- | अंदाजपत्रकात नमुद केल्याप्रमाणे तात्पुरती पुरक नळ योजना करणे. |
| 6 | मौ. जामठी खु. | हिंगोली | 350300/- | अंदाजपत्रकात नमुद केल्याप्रमाणे तात्पुरती पुरक नळ योजना करणे. |
| 7 | मौ. वांझोळा | हिंगोली | 390750/- | अंदाजपत्रकात नमुद केल्याप्रमाणे तात्पुरती पुरक नळ योजना करणे. |
| 8 | मौ. चोरजवळा | हिंगोली | 379700/- | अंदाजपत्रकात नमुद केल्याप्रमाणे तात्पुरती पुरक नळ योजना करणे. |
| | | | 2627159/- | **(अक्षरी:- सव्वीस लक्ष सत्तावीस हजार एकशे एक्कोण साठ रुपये केवळ.)** |

1. सदर योजना राबवितांना निवडणुक आदर्श अचार संहितेचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच सदर योजनेची तांत्रीक तपासणी संबधीत यंत्रणेने करुन घेणे आवश्यक राहील.
2. पाणी टंचाई कार्यक्रम सन 2018-19 अंतर्गत प्रस्तावीत केलेली उपरोक्त उपाययोजनेची अंमलबजावणी करण्यापुर्वी प्रत्यक्ष संबंधीत ग्रामिण पाणी पुरवठा विभागाने खात्री करावी.
3. सदर मंजुर कामांची टंचाई उपाययोजनांची अंमल बजावणी करण्यास टाळा-टाळ किंवा दिरंगाई करणाऱ्या संबंधीतांवर ग्रा.पं.अधिनियम 1959 मधील कलम 3 तसेच दप्तर दिरंगाई प्रतिबंध अधिनियम अन्वये कार्यवाही करण्यात यावी.
4. सदरील काम प्रशासकीय मंजुरी मिळाल्या पासुन 10 दिवसात पुर्ण करुन टंचाई कालावधीत गावाला पाणी पुरवठा करणे बंधनकारक राहील.
5. प्रस्तावीत काम टंचाई आराखडयात नमुद असल्याबाबत तसेच प्रस्तावास भुजल सर्वेक्षण विभागाने शिफारस केली असल्याबाबत खात्री संबधीत यंत्रणेने करावी.
6. दरसुची व्यतिरिक्त घेण्यात आलेल्या दरासाठी यंत्रणेने त्यांच्या सक्षम अधिकारी यांचे मान्यतेने दर विश्लेषन मजुर असल्याबाबत खात्री करावी. तसेच प्रस्तावातील घेण्यात आलेले वाहतुक दर व अचुक असल्याबाबत व अद्यावत दरसुचीने केली आहे याबाबतची व अंदाजपत्रकातील इतर तांत्रीक बाबीची संपुर्ण जबाबदारी संबधीत यंत्रणेची राहील.



(P.T.O)

7. विस्तृत माहितीसह स्थळदर्शक नकाशा व सविस्तर सामान्य अहवाल (परिपुर्ण हिस्ट्रीशीट ) सक्षम अधिकारी यांचे स्वाक्षरीने काम सुरु करण्यापुर्वी तयार ठेवावा.
8. आवश्यक त्या ठिकाणी प्रपत्र क्र. 3 मध्ये दुरुस्तीचा सविस्तर तपशील नमुद करावा. तसेच जुनी दुरुस्ती प्रस्तावीत असल्यास मुळ योजनेची सविस्तर टिप्पणी तयार ठेवावी.
9. प्रस्तावीत योजनेसाठी यंत्रणेने स्थळनिरिक्षण अहवाल प्राप्त केला आहे. तसेच दुरुस्ती खर्च वाजवी असल्याबाबतची खात्री करावी. याबाबतची सर्वस्वी जवाबदारी यंत्रणा प्रमुख यांची राहील.
10. शासन निर्णय दिनांक-3.2.1999 नुसार प्रस्तावीत बाबीच अनुज्ञेय राहतील याची तसेच सदर शासन निर्णयातील अटी व शर्तीचे पालन करणे संबधीत यंत्रणेस बंधनकारक राहील.
11. प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेल्या अंदाजपत्रकातील विवरणपत्रामध्ये विस्तृत स्वरुपात माहिती भरुन घेण्याची जबाबदारी यंत्रण प्रमुखाची राहील.विवरणपत्र भरताना अटी टिप टाकण्यात येवु नये.
12. टंचाई निवारण योजना किमान खर्चाची असल्याबाबत सर्वस्वी जबाबदारी यंत्रणा प्रमुख यांची राहील.
13. विशेष दुरुस्ती प्रस्तावीत करताना विशेष दुरुस्ती अनुज्ञेय असल्याबाबतची जवाबदारी यंत्रणा प्रमुखाची राहील.
14. उपरोक्त कामास दुस-या कोणत्याही पाणी पुरवठा योजनेमधुन पाणी उपलब्ध होत नसल्याबाबत संबधीत यंत्रणेने खात्री करावी.
15. पावसाळा सुरु झाल्यानंतर पाईप/पंपीग मशीनरी काढुन घेवुन संबधीत कार्यालयात तशी नोंद घेण्यात यावी.
16. नळ योजना टंचाई कालावधीत पुरत्या अनुज्ञेय राहील ज्याठिकाणी पुर्वी कार्यान्वीत पाणी पुरवठा योजना होती व त्याचा मुळ उदभव आटला किंवा पाणी कमी पडत असल्यामुळे त्याच ठिकाणी नळ योजना प्रस्तावीत केली असल्याबाबतची जबाबदारी संबधीत यंत्रणेची राहील.
17. प्रस्तावीत योजनेची अंमलबजावणी विहित कालावधीत पुर्ण न झाल्यास प्रदान करण्यात आलेली प्रशासकीय मान्यता व्यपंगत समजण्यात येवुन निधी वितरीत केला जाणार नाही याची नोंद संबधीत यंत्रणेनी घ्यावी.
18. प्रस्तावीत केलेले काम हे मागील काही वर्षात कार्यान्वीत झालेले नाही अशा कामाची पुर्नरावृत्ती होवुन योजनेचा दुरुपयोग होणार नाही याची संबधीत यंत्रणेने दक्षता घेणे आवश्यक आहे.
19. प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेल्या योजना हया त्यागावात दुस-या योजनेमधुन दुसरे काम सुरु नाही याबाबत संबधीत यंत्रणेने खात्री करावी.
20. झालेले काम हे अंदाजपत्रकाप्रमाणे झालेले आहे काय व त्याप्रमाणे कामाचा दर्जा आहे काय याबाबत यंत्रणेने दक्षता घ्यावी.
21. नियोजीत काम हे ज्याठिकाणी करावयाचे आहे ते स्थळ सर्वसाधारण अहवालात दर्शविण्यात यावेत याची खात्री संबधीत यंत्रणेने करुन घेणे बंधनकारक राहील.
22. उदभवास पुरेसे पाणी असलयाचे वरिष्ट भुवैज्ञानिक यांचे प्रमाणपत्र घेवुनच सुरुवात करावी.
23. शासन निर्णय दिनांक 3 फेब्रुवारी 1999 चे बाब क्रमांक 5 (3) मधील अ ते ई करावी.
24. काम सुरु झाल्याच्या दिनांक काम पुर्ण झाल्याचा दिनांक व कामाची प्रगती अहवाल वेळोवेळी या कार्यालयास सादर करावा.
25. योजनेचे माहिती ऑनलाईनवर माहिती भरण्याची दक्षता सबधीत यंत्रणेनी घ्यावी.त्याशिवाय निधी वितरीत होणार नाही याची दक्षता घ्यावी.
26. प्रपत्र ब मधील शिफारशी व मागील वर्षी मा.विभागीय आयुक्त,औरंगाबाद यांनी गठीत केलेल्या त्रिसदस्यीय समितीने तपासणी करुन तपासणी अहवालावरुन जिल्हाधिकारी कार्यालयाने मान्यता दिल्याशिवाय बिलाची अदायगी न करणेच्या अटीवर प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.
27. उपरोक्त योजनेचे आराखडयात किंमतीत झालेली आहे तसी दुरुस्ती कृती आराखडयात करण्यात याव्यात.
28. शासन नियमानुसार दिलेल्या आर्थीक मर्यादेवरील कामाचे ई-निविदा करणे बंधनकारक राहील तसेच सदरचे काम इतर योजनेतुन या पुर्वी करण्यात आले नसल्याची किंवा काम दुबार प्रस्तावीत केले नसल्याची खात्री संबंधीत यंत्रणेने करावी.
29. प्रस्तावीत योजनेचे काम सुरु करण्यापुर्वीचे फोटो, काम सुरु असतानाचे फोटो व काम झाल्यानंतरचे फोटो काढण्याची दक्षता घ्यावी.



(P.T.O.)

30. कामावर मंजुर अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा अधिकचा खर्च होणार नाही याची दक्षता घ्यावी व काम पुर्ण झाल्यावर कामाच्या पुर्णत्वाचे प्रमाणपत्र झालेल्या खर्चाचा संपुर्ण विवरणासह या कार्यालयास सादर करावा.

31. शासन निर्णय दिनांक 24 ऑक्टोबर 2008 मधील अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करावे.

32. शासन निर्णय दिनांक-31मार्च 2012 मधील अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करावे.

33. वरील अटी व शर्तीस अधिन राहुन प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

(रुचेश जयवंशी)
**जिल्हाधिकारी हिंगोली**

**प्रतिलीपी,** 1. मा.प्रधान सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग मंत्रालय मुंबई-32 यांना माहितीस्तव सादर.

2. मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर.

3. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.हिंगोली यांना माहितीस्तव व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

4. उपविभागीय अधिकारी, हिंगोली/कळमनुरी/वसमत यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

5. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जि.प.हिंगोली यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

6. वरिष्ठ भुवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण विकाय यंत्रणा हिंगोली यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव.

7. तहसिलदार, हिंगोली/सेनगाव/कळमनुरी/वसमत/औंढा ना. यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.

8. गट विकास अधिकारी हिंगोली/सेनगाव/कळमनुरी/वसमत/औंढा ना. यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.

9. एनआयसी विभाग जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली यांना देवुन कळविण्यात येते की सदर योजनेबाबत जिल्हयाच्या वेबसाईटवर टाकण्यासाठी देण्यात येत आहे.

10. जिल्हा माहिती अधिकारी हिंगोली यांना माहितीस्तव.

**जिल्हाधिकारी हिंगोली**